१७ जानेवारी २०१२

# शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न

केवळ शेतकऱ्यांचेच नव्हे तर प्रत्येकाचेच आयुष्य संघर्षमय असते. पण त्यावर आत्महत्या हा मार्ग नव्हे. हे सांगण्याचा प्रयत्न मुक्ती या चित्रपटात करण्यात आल्याचा दावा या चित्रपटाचे दिग्दर्शक मच्छिंद्र मोरे यांनी पत्रकार परिषदेत केला.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हा चित्रपट दाखवण्यात आला. एप्रिल महिन्यात तो प्रदर्शित होणार आहे. स्वतः शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मच्छिंद्र मोरे यांनी सन २००६ मध्ये या चित्रपटाचे लेखन केले. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय ही भळभळणारी जखम आहे. प्रत्येकाच्या जीवनात समस्या असतात. पण, त्यावर आत्महत्या हा उपाय नव्हे असे त्यांनी सांगितले आहे. चित्रपटाची नायिका संख्य समस्यांवर कशी मात करते ही चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना आहे.

मोरे म्हणाले की, कधीतरी कोणाच्या मनात आत्महत्येचा विचार येतो. त्यामागे त्याला या समस्यांना सामोरे जावे लागते. दुःख ज्याला भोगावे लागते त्याला त्याच्या वेदना समजतात. मी स्वतः हे दुःख जवळून पाहिल्याने त्या पडद्यावर व्यक्त करु शकलो आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन करताना फक्त आर्थिक गणिते बघण्यापेक्षा दिग्दर्शक म्हणून विषयावर माझी किती पकड आहे हे मी महत्त्वाचे मानतो, त्यामुळे औपचारिक शिक्षण न घेताही मी दिग्दर्शक म्हणून माझी कामगिरी पार पडू शकलो. चित्रपट पाहिल्यानंतर आत्महत्येपासून कोणी परावृत्त झाले तर प्रयत्नांचे सार्थक होईल असे ते म्हणाले.

मराठी चित्रपट तयार होऊनही लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी कलाकारांची मदत होत नाही. या सार्वजनिक तक्रारींबाबत बोलताना अभिनेते नागेश भोसले आणि नंदू माधव यांनी निर्मात्यांच्या धडपडीस कलाकारांनी पाठबळ देणे आवश्यक आहे असे सांगितल

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३९४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY Pune Film Foundation

JOINTLY WITH Government of Maharashtra